JAMKHED MAHAVIDYALAYA, JAMKHED
Dist. Ahmednagar (MS)

# जामखेड महाविद्यालयात अर्थशास्त्र पोष्टर प्रदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न*

**दिनांक 28 मार्च 2023**




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, व दि पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे, जामखेड महाविद्यालय, जामखेड IQAC विभाग व अर्थशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'अर्थशास्त्र पोष्टर प्रेजेंटेशन' कार्यक्रम दिनांक 28 मार्च 2023 रोजी सम्पन्न झाला, या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी दि पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे खजिनदार श्री.राजेशजी मोरे होते. या प्रसंगी जामखेड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डोंगरे एम. एल. महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ.नरके एस. वाय,तसेच महात्मा फुले नूतन महाविद्यालय, मिरजगावचे , अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. कासले व्ही. व्ही., प्रा. गोलाईत पी.एस. इ. मान्यवर व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभागातील प्रा. मोहळकर एस. डी. यांनी केले. आपल्या प्रास्ताविकामध्ये महाविद्यालयातील विविध उपक्रमाबद्दल त्यांनी माहिती दिली. महाविद्यालय सातत्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वेगवेगळे उपक्रम राबवते त्याचाच एक भाग म्हणून अर्थशास्त्र विभागाच्या माध्यमातून एकदिवसीय पोस्टर प्रदर्शन आयोजित केले असून महाविद्यालय विद्यार्थी केंद्रित

बनण्यासाठी व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढण्यासाठी या उपक्रमाचा फायदा होईल असे मत मांडले. यानंतर अर्थशास्त्र विभागातर्फे पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. राजेशजी मोरे यांनी महाविद्यालयात होणाऱ्या विविध उपक्रमांचे कौतुक केले तसेच पोस्टर प्रदर्शन हे आपली माहिती प्रभावीपणे मांडण्याचे साधन असल्याचे म्हटले महाविद्यालयात होणाऱ्या उपक्रमांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले आणि कार्यक्रमाला त्यांनी शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ डोंगरे एम. एल. यांनी उपस्थित विद्यार्थ्यांचे कौतुक करून महाविद्यालयात होणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना दिली, तसेच विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या पोस्टर बद्दल मार्गदर्शन केले व महाविद्यालयात होणाऱ्या बदलांना मूर्त स्वरूप देण्यासाठी पुढील काळात वेगवेगळे उपक्रम घेण्यासाठी सर्व विभागांना व विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.. प्रमुख मार्गदर्शनपर व्याखानामध्ये महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. नरके एस. वाय. यांनी अर्थशास्त्र विभागामार्फत घेतलेल्या या कार्यक्रमाचे महत्त्व सांगितले विद्यार्थ्यांच्या हितासाठी व नाविन्यपूर्ण संकल्पना राबवण्याबद्दल त्यांनी विभागाला शुभेच्छा दिल्या तसेच विद्यार्थ्यांनी या पोस्टरच्या माध्यमातून आपल्यातील सुप्त कलागुणांना वाव द्यावा अशी भूमिका मांडली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा कासले व्हीव्ही यांनी एक पोस्टर एका पुस्तका इतकी माहिती संकलित करण्याची क्षमता राखते व विद्यार्थ्यांनी केलेल्या नाविन्यपूर्ण कलात्मकतेची त्यांनी प्रशंसा केली. संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. उद्धवबापू देशमुख, उपाध्यक्ष श्री. अरुणकाका चिंतामणी, सचिव मा. श्री. शशीकांत देशमुख, सहसचिव मा. श्री. दिलीपशेठ गुगळे, , संचालक मा.श्री. अशोकशेठ शिंगवी यांनी महाविद्यालयात होणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांचे कौतुक केलें.कार्यक्रमाच्या शेवटी अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. गोलाईत पी एस यांनी उपस्थितांचे आभार मानले.हा कार्यकाम यशस्वी करण्यासाठी प्रा. ठोंबरे एस .एस प्रा. मिसाळ टी. एम. , प्रा. रेडे व्ही व्ही प्रा. महारनवर डी एस प्रा. देशमुख एच एस प्रा. मोहळकर एस डी , प्रा. डॉ. आण्णा मोहिते ,प्रा. धिंदळे , प्रा. जावळे , प्रा भाकरे आर. ए. व सर्व प्राध्यापक, सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मार्गदर्शन व योगदान लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालक म्हणून प्रा. मोहळकर एस. डी. यांनी केले.